# शाहिरी वाङ्मयातील समाजजीवन

**सौ. नम्रता योगेश पाटील**
संशोधक विद्यार्थीनी
मराठी विभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रास्ताविक**

शाहिरी काव्य हा मराठीतील वैशिष्ट्यपूर्ण काव्य प्रकार आहे. संत काव्यातील पद गौळणी, तत्वज्ञान, अध्यात्म पंडिती काव्यातील पौराणिक कथा, आख्याने, युध्द कथा यांचा मिलाफ शाहिरी काव्यामध्ये झालेला दिसत असला तरी शाहिरांनी प्रत्यक्षजीवनातील लौकिक विषय मांडले व आपली कवने रचली. अरबी फारशीतील 'शायर'अथवा 'षाइर' या शब्दापासून शाहिरी या शब्दाची निर्मिती झाली असल्याचे मानले जाते. 'विशिष्ट' प्रकारच्या कवनांची दृकश्राव्य गेय, नृत्य पध्दतीने रचना करणारे व समाजाचे मनोरंजन व प्रबोधन करणारे ते शाहीर असे मानले जाते. शाहिरी वाङ्मयामध्ये लावणी व पोवाडा हे मुख्य प्रकार येतात. शाहिरी वाङ्मयाचा विचार करता शिवकालीन पोवाडे अगदी थोडे सापडतात. कारण पोवाड्याचा हेतूच प्रचलित राजस कृतीती प्रशस्ती करणे हा आहे. शिवकालामध्ये असे विविध अविष्कार होत गेले व त्यापासून पोवाड्यासारख्या किर्ती काव्याची निर्मिती झाली. लावणीचा उगम मनोरंजनाच्या हेतूने उत्तर पेशवाईमध्ये झालेला दिसतो. याला कारणीभूत होती तत्कालीन परिस्थिती पानिपतच्या युध्दानंतर मराठ्यांची मोठी हानी झाली. संपूर्ण समाज औदास्याचे जीवन जगत असताना त्यांच्या मनावरील मळभ दूर करुन त्यांच्या जीवनात रंग भरण्याचे चैतन्य स्फूर्ती देण्याचे मोलाचे कार्य शाहिरांनी आपल्या कवणातून केले. यासाठी शाहिरांनी आपल्या लौकीक जीवनातील घटना, प्रसंग यांचा आधार घेऊन बोलीभाषेचा वापर करु सोप्यात सोप्या भाषेमध्ये आपले ज्ञान समाजासमोर ठेवले. या कालखंडामध्ये शाहीर राम जोशी, अनंत फंदी, होनाजी बाळा, परशराम, प्रभाकर, सगनभाऊ यांची कवने प्रसिध्दीस आली व आलीकडील शाहीर पठे बापूराव, हैबती घाटगे, शंभू राजू भिलवडीकर इ. अशा इतर अनेक शाहिरांची कवने प्रसिध्द झाली. शाहिरांनी तत्कालीन समाज, सामाजिक, राजकीय परिस्थितीचा विचार करुन प्रत्येकत रसिक मनाच्या अभिरुचीचा विचार करुन आपल्या कवनांची निर्मिती केली. मानवी जीवनातील लौकीक विषय विशिष्ट ढंगाने त्यांनी समाजासमोर मांडले. त्यामध्ये त्यांनी भक्ती, अध्यात्म,शृंगार, उपदेश, पराक्रम इ. सोबतच समाजचित्रण व संस्कृती चित्रही केले. त्यांची कवने मानवी जीवनाची कहाणी होती. म्हणून शाहीरी काव्याला मराठी काव्याची प्रभात असे म्हटले जाते. शाहिरांची रचना समकालाशी निगडीत होती. समाजामध्ये जे वास्तव्य घडते आहे आणि पूर्वी जे अद्भुत घडून गेले आहे. याचे चित्रण त्यांनी तत्कालीन समाजाल रुचेल, पचेल व आवडेल असेच केले. त्यासाठी त्यांनी मानवी लौकीक जीवन,समाजचित्रण व संस्कृतीचा आधार घेतला. शाहिरांनी आपल्या काव्यातून समाजजीवन व संस्कृतीचित्रण कसे केले आहे हे पाहण्यापूर्वी थोडक्यात आपण या वाङ्मयाची पूर्व परंपरा व स्वरुप पाहू ते पुढीलप्रमाणे –

**शाहिरी वाङ्मयाची पूर्वपरंपरा**

कोणत्याही साहित्य निर्मितीमागे पूर्व परंपरा ही असतेच. पूर्वीच्या परंपरेतून नवे साहित्य जन्म घेत असते. शाहिरी वाङ्मयाचा विचार करता या वाङ्मयाच्या पूर्वपरंपरेबाबत अनेक अभ्यासकांनी विविध मते मांडली आहेत. आपण म्हणतो की 'पोवाडे' हे शिवकालापासून व 'लावणी' हे पेशवेकाळापासून आली पण त्याआधीपासूनही या रचना होत असाव्यात असे काही मत मांडली आहेत. शाहीरी वाङ्मयाचे महत्त्वाचे दोन प्रकार पडतात.

१) पोवाडा
२) लावणी

या दोन्हींचा आपण एकत्रितपणे याठिकाणी विचार करुन पोवाड्याचा विचार केला तर अभ्यासकांच्या मते

पोवाड्यांना वेदकाळापासून परंपरा दिसते. पोवाडा म्हणजे 'ठासून स्तुती करणे' हा अर्थ लावून प्र + स्तुती = प्रशस्ती ही कल्पना आर्यसंस्कृतीत अगदी प्राचीन आहे. हे त्यांनी इंद्राच्या राज्याभिषेक समयीच्या 'अभ्युत्क्रोशाचे' उदाहरण देऊन स्पष्ट केले आहे. ज्ञानेश्वरकालीन वाङ्मयात म्हणजे बाराव्या शतकातही पोवाडा हा शब्द आल्याचे दिसते.

*निवृत्ती मुक्ताबाई चांगदेव गाढा । हरिचा पोवाडा झेलताती ।।*

याचबरोबर यादव कालामध्ये उत्तर भारतामध्ये भाटांची परंपरा होती. या भाटांच्या काव्याला 'यशोगान' अथवा 'बिरुदगान' म्हणतात. त्यांचे हे काव्य म्हणजे किर्तीकाव्यच होते. राजस्थानातून राजपूत कुळांबरोबर अनेक भाट महाराष्ट्रात आले आणि त्यांचेच पुढे शाहीर झाले असे मानले जाते.

- 'पोवाडा' म्हणजे किर्ती काव्य. 'वीरांच्या पराक्रमाचे विद्वानांच्या बुध्दिमत्तेचे, तसेच एखाद्याचे सामर्थ्य गुण, कौशल्य इत्यादी काव्यात्म वर्णन, प्रशस्ती स्तुती स्त्रोत्रे म्हणजे पोवाडा होय.' व्युत्पत्तीच्या दृष्टीने संस्कृतीतील प्र+वद या धातूवरुन हा शब्द आल्याचे अभ्यासकांनी मांडले आहे. पोवाड्याचा सर्वात जुना उल्लेख महिकावतीच्या बखरीत आढळतो असे वि. का. राजवाडे म्हणतात. 'बिंबराजाचा पुत्र केशवदेव याने मोठ्या ऐश्वर्याने बारा वर्षे राज्य केले. त्याने राजपितामह म्हणजे आसपासच्या सर्व लहानसहान संस्थानिकांचा आजा, ही पदवी धारण केली व त्या अर्थाचे बडेजाविचे गद्य-पद्य पोवाडे रचले. केशवदेवाच्या काळचे म्हणजे शके ११००-१२०० च्या सुमाराचे हे पोवाडे असून गद्य-पद्य आहेत. राजवाडे यांनी पोवाड्याची परंपरा चंपू काव्याशी निगडीत असल्याचेही दाखविले आहे. एकंदरीत या सर्व मतांचा विचार करता असे दिसते की, हे सर्व मते अनुमानिकच आहेत. कारण पहिला उपलब्ध पोवाडा आपणास शिवकालातीलच सापडतो. पण या कालातील पोवाड्याचे स्वरुप बघता यादवकाळ ते शिवकाळ यामध्ये काही दुवे नक्कीच असले पाहिजेत. कारण कोणताही साहित्य प्रकार स्वयंभूपणे प्रकट होऊ शकत नाही. अज्ञानदास, तुळशीदास यांच्या रचना पाहता त्यामागे काहीना काही दुवे नक्कीच असले पाहिजेत, पण ते आज स्पष्ट नाहीत. पण याचा अर्थ असा की, हे दुवे नाकारुही शकत नाही. त्यामुळे यादवकालीन भाट, वेदकालीन परंपरा मराठीतील गोंधळीसारख्या परंपरा या सर्वांच्या समुच्चयातून पोवाड्याचे आजचे स्वरूप सिध्द झाले असावे असे म्हणण्यास हरकत नाही. गोंधळयाच्या परंपरेचाहि विचार पोवाड्याच्या निर्मितीमागे केला जातो. स्वतः शाहीर म्हणून घेणारे कवी गोधळात पुढे आलेले दिसतात. गोंधळामध्ये अध्यात्म असते आणि देवाची स्तुती केलेली असते, पोवाड्यामध्ये पराक्रम असतो. एखाद्या व्यक्तीची, घटनेची, सामर्थ्याची, संघर्षाची ठासुन स्तुती केलेली असते. दोघांची रचना, स्वरुप सारखेच असल्याने पोवाड्याची निर्मिती गोंधळ परंपरेतूनही झाली असावी असेही मत मांडले जाते.

लावणीच्या उदयाचा विचार करता, ती पेशवेकाळापासून निर्माण झाली असे म्हटले जाते. पण लावणीच्या निर्मितीबाबतही अनेक अभ्यासकांनी विविध मते मांडलेली दिसतात. आजपर्यंत जो लावणी वाङ्मयाचा अभ्यास झाला तो उत्तर पेशवाईतील राम जोशी, होनाजी बाळा, परशराम प्रभाकर, सगनभाऊ इत्यादी शाहिरांच्या उपलब्ध असलेल्या लावणीच्या संग्रहावरुन त्यामुळे लावणी वाङ्मयाचा प्रारंभ उत्तर पेशवेकाळापासून झाला असे म्हणणे स्वाभाविक आहे. परंतु अलिकडे या वाङ्मयाचा जसजसा अभ्यास होऊ लागले तसे अभ्यासा अंती एक निष्कर्ष हाती आला की, सर्वात जुन्यात जुनी 'लावणी' ही एकनाथ कालीन 'मन्मथ' शिवलिंगाची आहे. मन्मथ हा लिंगायत संप्रदायाचा होता त्याचा गुरु सिध्द व त्यांचे गुरु नागेश यांनीही अशा प्रकारची रचना केली असावी असे मत मांडले जाते. त्यामुळे लावणीची परंपरा ही बरीच जुनी असल्याचे सांगितले जाते. तसेच लावणीचे मूळ हे प्राधान्याने लोकगीतांमध्ये असावे असाही एक विचार मांडला जातो. लावणी व लोकगीत यामध्ये बऱ्याच प्रमाणात साम्य दिसून येते. लावणीची भाषा ही लोकगीतासारखीच असते. लोकगीतांसारखीच लावणी ही स्फूट रचना आहे.. लोकगीताप्रमाणेच लावणी ही आत्मनिष्ठ असते त्यातील भावनाविकार ही स्थूल स्वरुपाचा असतो. त्यामुळे अशा काही साम्यामुळे लावणीचे मूळ लोकगीतामध्येही शोधले जाते. 'लावणी' या शब्दाच्या व्युत्पत्तीवरुनही त्याचे मूळ शोधण्याचा प्रयत्न केला. अ. ब. कोल्हटकरांनी हृदयाला चटका लावते ती 'लावणी' असे म्हटले आहे. तरी शेतात लावणी करताना म्हटले जाते ते

लावणीगीत. लावण सुंदर, लावण्य म्हणजे सौंदर्य. त्याचे दर्शन जीमध्ये होते ती लावणी. तसेच लापनिका या संस्कृत शब्दावरुन लावणी हा शब्द निघाला असावा असेही म्हटले जाते. तसेच शहाजीराजांच्या दरबारी पंडित सामदेव होता. त्याने सांगितलेल्या बारा नृत्यप्रकारात 'लावण्म' नावाचा एक नृत्यप्रकार येतो. त्याचे लक्षण हे एक हात पताकेसारखा आणि दुसरा हात कमरेवर अर्धचंद्राकृती असा ठेवलेला आणि नंतर दोन्ही हात कमरेवर ठेवून रुपकासारखे केलेले नृत्य ते लावण्य नृत्य होय. 'लावण्म' हे संस्कृत नाव असले तरी 'संगीतदर्पण' या ग्रंथात त्याचा निर्देश 'लावणी' या देशी नावानेच केला आहे. त्यावरुन लावणी या नावाच्या देशी नृत्यप्रकारावरुन लावणी आलेली आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. यावरुनच 'लावणी' ही लोकगीतसदृश अशी रचना आहे. तसेच श्रमगीतांनाही जवळ करणारी ही रचना वाटते. त्यावरुन 'लावणी' चा प्रसंग लावणी ठरो की कापणी ठरो' ती सुभग अशी रचना असो वा नसो. तो गीतप्रकार असो वा नृत्यप्रकार असो तिचा प्रारंभ किंवा मूळ लोकगीतातच आहे असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.

**शाहिरी वाङ्मयाचे स्वरुप**

शाहिरी वाङ्मयामध्ये 'लावणी' व 'पोवाडा' हे दोन महत्त्वाचे घटक येतात. यांच्या स्वरुपाचा थोडक्यात विचार करु, प्रथम पोवाड्याच्या स्वरुपाचा विचार करु पोवाड्याच्या स्वरुपसिध्देश्वर गोंधळयाच्या परंपरेचा परिणाम झाला असे म्हटले आहे. त्यामुळे गोंधळामध्ये असणारे अनेक घटक आपणास पोवाड्यामध्ये दिसून येतात. पोवाडा हे एक कथाकाव्य आहे. ते शाहिरांकडून सादर केले जाते. ती एक दृकश्राव्य रचना आहे. त्यामुळे श्राव्य कथेच्या सर्व लकबी यामध्ये आपल्याला दिसून येतात. या काव्याची रचना हीह धावती व नाट्यमय असते. पोवाडे गद्य व पद्य मिश्रीत असतात. पोवाडा हे एक प्रकारचे नाटकच असते. त्यामध्ये अनेक पात्रे असतात. मुख्य शाहीर व त्याचा साथीदार हे पोवाड्यातील सोंगाची बजावणी करतात. मुख्य पात्राची बतावणी शाहीर करतच असतो शिवाय कथानकाचा धागा शाबूत ठेवणे कथेचे तात्पर्यही तो सांगण्याचा प्रयत्न करतो. हे काव्य दृश्यही असल्याने आपल्या अभिनयाने आवाजांची चढउताराने तो प्रेक्षकांना आकर्षित करतो. पोवाड्यांची रचनाच मुळी प्रेक्षकांची उत्कंठा वाढवणारी असते. त्यामुळे शाहिराचा हावभाव, सोबत वाद्यांची साथ, आवाजाची चढउतार निवेदने निर्माण होणारा विनोद, हास्यनिर्मिती, प्रसंगनिर्मिती रसपरिपोष इत्यादीनी कथेला बहर येतो. त्यामुळे प्रेक्षक हे अधिक संख्येने पोवाड्याकडे आकर्षित होतात. पोवाड्याचा नृत्य-गेय धावती रचना असल्याने ते प्रेक्षकांच्या पसंतीस उतरतात. तसेच पोवाड्याची सुरुवात करताना शाहीर प्रथम नमन करतात. त्यास पोवाड्याचे तोंड म्हटले जाते. हे नमन ईश्वराचे असते किंवा पोवाड्यामध्ये पुढे जी कथा गायिली जाणार आहे त्यालाच आवाहन केले जाते. अशा प्रकारचे साधारणतः आपणास पोवाड्याचे स्वरुप दिसून येते. लावणीच्या स्वरुपाचा विचार करता ते पोवाड्यापेक्षा पूर्णतः वेगळे आहे. कारण पोवाडे हे वीर रसात्मक असतात तर लावणी ही श्रृंगारिक आहे. त्यामुळे ती पोवाड्यापेक्षा भिन्न आहे. 'आहेत तर ती एकाच बापाची मुले पण स्वरुपाने भिन्न आहेत.' लावणीचे उद्दिष्ट समोर बसलेल्या सर्वांची करमणूक करणे हेच होते. त्यामुळे तीही नृत्य, नाट्य, संगीतमय दृकश्राव्य अशी रचना आहे.. लावणीमध्ये 'ढोलकी' या वाद्याला आणि 'नृत्य' या कलेला अधिक महत्त्व आहे. अशा प्रकारची लावणी उत्तर पेशवाईत दिसते. लावणी सादर करताना प्रथम शाहीर 'गण' म्हणतो. गणपतीस्तवनानेच लावणीची सुरुवात होते. त्यानंतर गौळण सादर केली जाते. श्रीकृष्ण, राधा, गोपिका यांची पात्रे आणि प्रसंग उभारुन सुंदर अशा हास्यविनोदाने नटलेल्या गवळणी तमाशाच्या रंगमंचावर सादर केल्या जातात. त्यानंतर 'लावणी' सादर होते. काही भेदीक लावण्या सादर केल्या जातात. तर काही ठिकाणी 'वग' सादर केला जातो. अशी साधारणतः रचना दिसते. लावणीच्या स्वरुपाचा विचार करता तिचे अनेक प्रकार पडतात. श्रृंगारिक लावणी, अध्यात्मिक लावणी, भेदिक लावण्या, उपदेशपर लावण्या, वैराग्यपर लावण्या, कधनपर लावणी, विनोदपर लावणी, व्यक्तीवर्णनपर लावणी, स्थानमहात्म्यपर लावणी इ. असे विविध प्रकार दिसतात, मनोरंजन करणे हाच लावणीचा उद्देश असल्याने मानवाच्या लौकीस जीवनातील विषय लावणीचे विषय बनले. त्यामुळे समाजाची दुःखे, सुखे आपलीच मानून ती शाहीरांनी लावणीतून व्यक्त केली. त्यामुळे समाजाला 'लावणी' अधिक जवळची बाटली. कारण जे प्रत्यक्षात घडत आहे तेच सादर केले गेले. त्यामुळे लावणीकडे आकर्षित होणारा प्रेक्षक वर्ग वाढला जसा समाज बदलत गेला तशी लावणीही बदलली

म्हणजे 'लावणी' ही लवचिक आहे. ती प्रवाहासोबत बदलत असते. अशाप्रकारे आपणास लावणी व पोवाड्याचे थोडक्यात स्वरुप सांगता येईल. लावणीमधून विविध विषय मांडले गेले. त्यापैकी या वाङ्मयातील समाजचित्रण व संस्कृती चित्रण कसे झाले ते पाहू.

**शाहिरी वाङ्मयातील समाजचित्रण व संस्कृती चित्रण**

समाजाला नवे बळ देण्याचं व शाहिरी वाङ्मयान केलं आहे. पानिपतच्या युध्दानंतरर समाजामध्ये एक प्रकारची विरसता आली होती. समाज दु:खाचे जीवन जगत होता. या समाजामध्ये उत्साह निर्माण करण्याचे काम या वाड्मयाने केले. 'लावणी' व 'पोवाडा' हे दोन घटक या वाङ्मयामध्ये येतात. 'पोवाडे' हे राजकीय जीवनातून निर्माण झाले तर लावणी' सामाजिक जीवनातून निर्माण झाली. अवनत समाजाचे शाहीर हे घटक होते आणि समाजाचे मनोरंजन करणे हा त्यांचा पेशा होता. तत्कालीन लोकजीवनाचा विचार करता शाहीरांनी आपल्या कवनातून समाजजीवन आणि संस्कृती चित्रण केले आहे. संपूर्ण जीवनदर्शन लोकांसमोर उभे करणे व त्यातून प्रबोधन घडवून आणणे हा त्यांचा हेतू दिसतो. यासाठी त्यांनी दैनंदिन जीवनातले लौकिक विषय निवडले. मग यामध्ये त्यांनी तत्कालीन कुटुंब व्यवस्था, कौटुंबिक नातीगोती, कुटुंबामध्ये असणारे स्त्रीचे स्थान, स्त्रीची विविध रुपे, तिचे भावबंध तसेच प्रचलित रुढी, परंपरा, दिनक्रम, सण, उत्सव तसेच तत्कालीन विवाह पध्दती यामध्ये बालविवाह, विषमविवाह, नपुसंकती, विधवेचे दु:ख, सतीप्रथा, व्यभिचारी स्त्रिया, कलावंतीणीची दु:खे शाहिरांनी आपल्या काव्यातून रेखाटली आहेत. तसेच तत्कालीन अलंकार आणि वेशभूषा याचेही चित्रण शाहिरांनी आपल्या कथनातून केले आहे.

*उदा. भरजरी आंगडे कुचडे गे। लखलखीत प्रभा पडली*
*आणून जरीची टोपी त्यावरी जाळी काढविली ।।*

यावरुन तत्कालीन समाजातील स्त्री-पुरुष आपल्या घराण्याला शोभेल अशीच वेशभूषा करत होते याची कल्पना येते. लावणीप्रमाणेच पोवाड्यातही विविध समाज चित्रणे आलेली दिसतात, पोवाडा सादर करत असताना त्यावेळची सामाजिक व राजकीय स्थिती कशी होती त्यावेळचे वर्णन करताना विविध समाज चित्रणे दिसतात.

*उदा. नऊ हात जमीत उडाला। मोगलाला माराया गेला*
*हातामधी हात ज्याने अठरा टाकीले ।*
*गुंजभर नाही जो सरला ।।१।।*

यामध्ये तानाजी व उदयभान यांचे तौलनिक बलाबल दाखविणाऱ्या या प्रसंगाचे चित्रमय वर्णन दिसते. तसेच ते लावणीतही दिसून येते. बालकृष्ण व त्याची माता यांचा प्रितिसंगम शाहिरांनी सुंदररित्या चित्रिक केला आहे.

*उदा. म्हणे यशोदा कृष्णाबाई।*
*गालबोल लावू दे दृष्ट तुज होईल करु काई ।। धृ।।*

असे विविध तत्कालीन प्रसंगातून शाहिरांनी संस्कृती दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. शाहिरांनी आपल्या कवनातून निसर्गाचेही वर्णन केले आहे. चंद्र, तारे, आकाश, शेती, ऊस, आंबा इ. विविध निसर्ग वर्णनेही त्यांनी आपल्या कवनातून केली आहेत. प्रभाकरच्या एका लावणीमध्ये

*झुळझुळ वारा वाहतो, चांदणे थंड ग।*
*झगमग तारे करिती आकाशी उदंड ग ।*
*विरहणीचे दु:ख ही त्यांनी आपल्या कवनातून मांडले आहे.*
*जगी म्हणतात । प्रित पतंगाची खरी ।*
*झड घालूनी प्राण देतो दीपकाचेच वरी ।।*

शाहिरांनी आपल्या कवनातून विविध स्थळांची वर्णने केली आहेत. पंढरपूर, तुळजापूर, कोल्हापूर सारखी तीर्थक्षेत्र यांची महती तसेच लोणावळा, खंडाळा, पन्हाळा, काश्मिरीसाररखी पर्यटन क्षेत्रे यांचेही सुंदर वर्णन त्यांच्या कवनातून येते. लावणीकारांनी समकालीन समाजाचे चित्ररेखाटले आहे. पेशवे काळात मराठ्यांच्या भरभराटीचे चित्रण येते. तर शाहीर राम जोशी यांची दुष्काळावरील लावणी प्रसिध्द आहे. तर अनंत फंदीने बदलत्या काळासंबंधी केलेली तक्रार दिसते. आजही सामाजिक विषयाला धरुन अनेक लावणी व पोवाडे निर्माण झालेले दिसतात. आज आपण २१ व्या शतकाकडे जात आहोत. समाज बदलाला विषय बदलले तरी 'लावणी' व 'पोवाडे' यांचे मूळ स्वरुप टिकून आहेत. मराठी साहित्य क्षेत्रामध्ये या वाड्मयाने आपली पताका उंचच उंच फडकवली आहे. आजच्या युगातील सामाजिक समस्या म्हणजे रस्ता सुरक्षा, पाणी वाचवा, प्रदुषण नियंत्रण, गर्भपात, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, हुंडाबळी इ. असे किती प्रश्न आहेत जे समजाला भेडसावत आहेत. तर या सर्व प्रश्नांची जनजागृती करण्यासाठी असे विविध विषयपर जनजागृती करणारे पोवाडे आज गायिले जातात. जसा समाज

बदलला तसे विषय बदलले पण 'पोवाडा' आहे तोच आहे याचे उदाहरण द्यायचे झाले तर रस्ता सुरक्ष अभियान पोवाडा'

*उदा. ऐका ऐका लहान थोरांना, चालक मालकांनो, प्रवाशी बांधवांनों। सर्व तुम्ही द्याहो इकडे ध्यान, करुनी आपल्या जीवाने कान रस्ता नियमाचे घेवा हो भान जी जी जी ।।१।।*

असे पोवाडे आज गायिले जात आहेत. अशाच पध्दतीच्या व्यसनमुक्तीच्य संदर्भातही पोवाडे गायिले जातात. व्यसन म्हणजे समाजाला लागलेली कीड आहे व्यवनाने संपूर्ण कुटुंब उध्वस्त होते. त्यामुळे हे व्यसनमुक्तीच्या संदर्भात जनजागृती करणा पोवाडे आज दिसतात.

*शाहीरीची गीते गाती अनिवार । शासनाची योजना प्रसिध्द फी फार । दारुबंदीचा करिती प्रचारा ।। जी जी...*

असे विविध जनजागृतीपर समाजामध्ये प्रचार व प्रसाराचे काम आज शाहिरी वाङ्मय करत आहेत. तसेच विविध व्यक्तींचे वर्णन करणारेही पोवाडे, लावण्या शाहिरांनी रविली आहेत. होनाजीची 'अनंत फंदी कवनाचा सागर' अथवा राम जोशी यांची 'दैवे बया बाईची गाठ पडली सांची' या लावण्या व्यक्तीवर्णन आहेत. तसेच अलिकडे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, म. ज्योतिराव फुले यांच्यावर विविध पोवाडे दिसून येतात. पंडित नेहरूंचा पोवाडा आपण याठिकाणी पाहू.

*भारताचा महामेरु। पंडीत नेहरु । देश आधारु ।।*
*देश स्वातंत्र्याला, लावी हातभार ।।*
*कर्तव्याचा गाऊ थोडासा सार ।।*

असे विविध सामाजिक चित्रण करणारे पोवाडे व लावण्या दिसून येतात. तसेच संस्कृती चित्रणही दिसून येते. तत्कालीन पतिव्रता स्त्रिया, बाळांचे बारशांचे वर्णन, विविध रुढी, परंपरा, सण, व्रतवैकल्ये, दागिने इत्यादीतून संस्कृती दिसून येते. अशाप्रकारे समाज बदलला, नवनवीन शोध लागले, विविध आशयाचे, विषयाचे नवे साहित्य प्रवाह निर्माण झाले तरी मराठी वाङ्मयामध्ये शाहिरी वाङ्मयाचे स्थान अद्यापही टिकून आहे. या वाङ्मयाने मराठी वाङ्मयाला लाख मोलाची देणगी दिली आहे. मराठी काव्याची सोनेरी प्रभात म्हणजे शाहिरी काव्य असे म्हटले आहे. शाहिरी काव्य ही अस्सल मराठमोळी निर्मिती आहे. तेव्हापासून खऱ्याअर्थाने मराठी अस्सल भाषेतील वगण्य निर्माण झाले असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. आजही लावणी, पोवाड्यांना तितकीच गर्दी दिसून येते. लावणीचा वा पोवाड्याचा कार्यक्रम असेल तर आजही प्रेक्षक आवर्जून तिकडे जातात. लावणीचा नाद ऐकल्यावर आजही रसिक बसल्या जागेवर डोलू लागतो. अशी जादू या वाङ्मयामध्ये आहे. हरहुन्नरी अस्सल मराठमोळी भाषा, डौलदार संगीत, अभिनव, समाजाबरोबर होणारा बदल, विविध प्रसंगनिर्मिती, समाजाबरोबर बदलती भाषा, रंजनपरता यामुळे आजही मराठी साहित्यात शाहिरी वाङ्मयाचे स्थान तितकेच अटळ आहे. जितके आधी होते. बदलत्या समाजाबरोबर लावणीनेही मोबाईल, रिंगटोन, नेट, ई-मेल, लॅपटॉप, गॉगल इ. असे विविध नवीन शब्द स्वीकारले त्यामुळे ती आजच्या पिढीआधी अधिक जवळची वाटते. अशाप्रकारे समाज प्रवाहाबरोबर बदलणारे, प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेऊन त्यांच्या मनात हार हार करणारे असे हे शाहीरी वाङ्मय विविधांगी आहे. मानवाच्या लौकीक जीवनातील, समाजातील, राजकीय इ. अशा विविध क्षेत्रातील छोट्यात छोट्या घटकांचा विचार करुन रचना करणारे ते कवी आणि त्यांचे काव्य यांचे कौतुक करावे तितके थोडेच आहे. म्हणूनच तर समकालीन मराठी साहित्यात शाहिरी वाङ्मयाचे योगदान हे अष्टपैलू आहे.

**संदर्भ ग्रंथ**

1. म.वा.धोंड, मऱ्हाठी लावणी
2. वि. क्रु जोशी , लोकनाट्याची परंपरा
3. म.ना सहस्त्रबुद्धे , मराठी शाहिरी वाडमय